# जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग-रायगड
# एम.ए. मराठी-भाग - १-प्रवेश सूचना-२०२२-२३

जे.एस.एम.कॉलेज, अलिबाग मध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी **एम.ए. मराठी** प्रवेश सुरु करण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए. (6 UNIT / 3 UNIT PAPER) पदवी मराठी विषयातून प्राप्त केली आहे, त्यांना एम.ए. मराठी या विषयाला थेट प्रवेश मिळणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी **मराठी विषयाशिवाय अन्य कोणत्याही विषयातून पदवी प्राप्त केली आहे, तसेच ज्यांनी विज्ञान व वाणिज्य शाखेतून पदवी प्राप्त केली आहे** अशा विद्यार्थ्यांना एम.ए. मराठी विषयाला प्रवेश घ्यायचा असेल तर ***विद्याशाखाबदल प्रवेशपूर्व परीक्षा*** उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

❖ **प्रवेशाकरिता मार्गदर्शक सूचना:**

१) **प्रवेशाकरिता पात्रता:** एम.ए. मराठी करिता मराठी विषयातून बी.ए. पदवी प्राप्त किंवा समकक्ष म्हणून मान्यताप्राप्त दुसऱ्या विद्यापीठाची परीक्षा. टीवायबीए परीक्षेत सत्र ५ व ६ मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे प्रवेश देण्यात येईल.

२) दि.२२ जून ते दि. ९ जुलै २०२२ या कालावधीत महाविद्यालयाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रात (Student Facility Centre) जाऊन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे.

४) प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा Pre-registration form ( पूर्व-नोंदणी अर्ज) भरणे बंधनकारक आहे. विद्यापीठाचा Pre-registration form भरल्याशिवाय प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार नाही व महाविद्यालयातर्फे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला प्रवेश रद्द होऊ शकतो याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

५) जे विद्यार्थी सत्र सहाची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत परंतु अद्याप ज्यांना सत्र सहाची गुणपत्रिका मिळालेली नाही असे विद्यार्थी Provisional mark sheet सादर करून प्रवेश घेऊ शकतात. तथापि त्यांचे प्रवेश तात्पुरते राहतील.

६) मुंबई विद्यापीठ व राज्य सरकारने वेळोवेळी ठरवून दिलेले निकष व नियम व गुणवत्ता यांनुसार प्रवेश देण्यात येतील.

७) महाविद्यालयीन कार्यालयात प्रवेश शुल्क (प्रवेशासाठी एकूण फी - एम.ए. मराठी, भाग - १ - रुपये १०७५९/-) भरून प्रवेश घ्यावा. महाविद्यालयीन प्राधिकरणाकडून कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर व विद्यार्थ्याने प्रवेश फी भरल्यानंतरच प्रवेश निश्चित करण्यात येईल.

८) **प्रवेश रद्द करणे व प्रवेश शुल्काचा परतावा:-**

कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रवेश रद्द करण्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज केल्यानंतर प्रवेश रद्द करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत काही विशिष्ट रक्कम कपात केल्यानंतर फी परताव्याची रक्कम विद्यार्थ्यास दिली जाईल.

९) **अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडा –**

- १२ वी गुणपत्रिका
- एफवाय / एसवाय गुणपत्रिका
- सत्र ५ व ६ च्या गुणपत्रिका
- Leaving certificate
- Transfer certificate (अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी)
- Migration certificate (अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी)
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीचा दाखला
- DT/NT/OBC/SC विद्यार्थ्यांसाठी अलीकडील non creamy layer certificate
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी संबंधित प्रमाणपत्र आवश्यक आहे.
- टी.वाय.बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर गॅप असल्यास Gap certificate
- लग्नानंतर नाव बदलले असल्यास लग्नाच्या दाखल्याची (marriage certificate) प्रत
- मुंबई विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांसाठी टी.वाय.बी.ए. च्या तीन वर्षांच्या गुणपत्रिकेच्या स्व-साक्षांकित झेरॉक्स प्रती.

➢ **योग्य पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जासह वरील सर्व कागदपत्रांच्या प्रत्येकी तीन स्व-साक्षांकित झेरॉक्स प्रती सादर करणे आवश्यक आहे.**

१०) **प्रवेश परीक्षा (ENTRANCE EXAM.)** - ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए. पदवी मराठी विषयातून प्राप्त केलेली नाही किंवा ज्या विद्यार्थ्यांनी बी.कॉम. किंवा बी.एस.स्सी. पदवी प्राप्त केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना एम.ए. मराठी विषयाला प्रवेश घ्यायचा असल्यास विद्यापीठाच्या नियमांप्रमाणे प्रवेश परीक्षा (ENTRANCE EXAM.) द्यावी लागेल. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सदर विद्यार्थी एम.ए. मराठी प्रवेशाकरिता पात्र ठरतील. सदर प्रवेश परीक्षेबद्दलची सूचना स्वतंत्रपणे लावण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी एम.ए. मराठी प्रवेश परीक्षेकरिता प्रा.जयेश म्हात्रे (८६९८६०६२८५) यांच्याशी त्वरित संपर्क साधावा.

विभागप्रमुख, मराठी विभाग

J.S.M. ALIBAG COLLEGE

प्राचार्य

PRINCIPAL,
Smt. Indirabai G. Kulkarni Arts,
J. B. Sawant Science and
Sau. Janakibai Dhondo Kunte Commerce
College, Alibag. 402201, Dist Raigad